ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारतीय परराष्ट्र धोरणः भारत चीन संबंध''

**पुरुषोत्तम बाबासाहेब पाचोडे**
संशोधक विद्यार्थी
लोकप्रशासन विभाग
डॉ. बा. आ. म. विद्यापीठ, औरंगाबाद

प्रस्तावना :
दुसऱ्या महायुद्धानंतर परराष्ट्र धोरण ही स्वतंत्र आणि संघटित ज्ञानशाखा म्हणून ओळखली जाते. प्राचीन भारतात परराष्ट्र धोरण आणि राजनयाची माहिती मिळते. परंतु भारतीय राजकारणात परराष्ट्र धोरण आणि राजनय हा विषय दुर्लक्षित राहिलेला आहे. भारत वैश्विक संबंधाऐवजी स्थानिक संबंधामध्ये अधिक गुंतलेला आहे. परराष्ट्र धोरण हा विषय केवळ राज्यशास्त्राशी संबंधीत नसून त्याचा आंतर विद्याशाखांशी संबंध जोडला जातो. नव्वदीच्या दशकानंतर जागतिकिकरणाचा वैश्विक राजकारणावर मोठा प्रभाव पडलेला आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणामुळे विविध देशांच्या परराष्ट्र धोरणात अमूलाग्र बदल झाले आहे.

भारताचे परराष्ट्र धोरण अभ्यासतांना शेजारील राष्ट्रांसोबतचे संबंध विचारात घेणे आवश्यक आहे. भारत हा अशिया खंडातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे. त्यामुळे आपोआपच भारताच्या परराष्ट्र धोरणाला शेजारील राष्ट्रे प्रभावित करीत असतात. इ.स. 1990 नंतर जागतिक राजकारणातील स्थित्यंतरामुळे आणि जागतिकीकरण व उदारिकरणाच्या प्रक्रियेमुळे जग आणखी लहान झाले आहे. संपूर्ण विश्व एका खेड्यात रूपांतरित झाले आहे. जगातील उपरोक्त प्रक्रियांचा मागील काही काळात चांगला वाईट अनुभव भारत आणि शेजारील राष्ट्रांनी घेतला आहे. त्यामुळे आजच्या जगात परस्पराशी सहकार्य आणि सहजीवनाचा विचार करणे अगत्याचे ठरते. भारताच्या शेजारील राष्ट्रांपैकी आपण भारत चीन संबंध सदरील लेखात अभ्यासणार आहोत.

दक्षिण आशियातील भारत आणि चीन हे दोन्ही महासत्ता आहेत. परंतु भिन्न राजकिय विचारप्रणाली आणि सीमावादाच्या प्रश्नांमुळे भारत आणि चीनमध्ये संघर्ष सुरू आहे. पंडित जवाहरलरल नेहरूंनी पंचशील तत्वांचा परराष्ट्र धोरणात स्विकार केला. हिंदी–चीनी भाई–भाई अशी घोषणा केली, परंतु 1962 मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. भारताच्या काही प्रदेशात घुसखोरी केली. आणि अद्यापही चीनकडून भारतावरील आक्रमण थांबलेले नाही.

वास्तविक जागतिकीकरणानंतर चीनने भारताशी व्यापारी आणि राजनैतिक संबंध प्रस्थापित केले आहेत. दक्षिण आशियातील भारत आणि चीन या देशांनी समकालीन वैश्वीक राजकारणातील बदलते प्रवाह पाहता युद्धा ऐवजी आर्थिक देवाण घेवाण, परस्पर सहकार्य नैतीकता आणि मानवी विकासावर अधिक भर देणे गरजेचे आहे, ही संशोधनाची समस्या आहे.

शीत युद्ध काळात भारत आणि चीन हे दोघेही एकमेकांचे हित व उद्देश याविषयी भयभीत व प्रतिकूल होते. चीन भारताला साम्राज्यशाहीची एक पुरवणी समजत होता. भारत आशियातील चीनच्या विस्तारवादी धोरणा वि" ायी चिंतीत होता. या दोन देशातील संबंध, न सुटलेला सीमावाद, तिबेट मुद्दा आणि चीन पाकिस्तान परस्पर संबंध यासारख्या बऱ्याच मुद्यांमुळे निर्माण झालेल्या भांडणे व अविश्वासाच्या वारसामुळे वैशिष्ट्यपूर्ण बनने चालूच राहिले.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमीः**
बुद्धकाळात परराष्ट्र धोरण आणि राज्या–राज्यांमधील संवादावर अधिक भर होता. कौटिल्याने अर्थशास्त्र या ग्रंथात परराष्ट्र धोरणा संबंधीचे प्रारूप स्पष्ट केले आहे आणि सध्या जगातील अनेक देशंनी कौटिल्याच्या परराष्ट्र नितीचा अंगिकार केला आहे. दीड हजार वर्षापूर्वी फाड्याान चीनी प्रवाशाने भारतातील व्यापार, उद्योग, व्यवसाय, बाजारपेठासंबंधी माहिती प्रवास वर्णनात दिली आहे. मुघलकाळात स्वातंत्रपूर्व काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या 1938 च्या हरिपूर काँग्रेस अधिवेशनात भारताच्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट स्पष्ट होते. हरिपूर काँग्रेसच्या ठरावानुसार भारतीय लोक शेजारील राष्ट्रांशी आणि एका मानवी समुहाकडून दुसऱ्या मानवी समूहाची होणारी पिळवणूक थांबविणे आवश्यक आहे. यावरून असे स्पष्ट होते की, भारताने शेजारील राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध आणि सहकार्य यावर अधिक भर दिलेला आहे.

**पंडित जवाहरलाल नेहरूंचा परराष्ट्र धोरणावरील प्रभावः**
1950 ते 1962 चा कालखंड भारतीय परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने महत्वाचा मानला जातो. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची दोन गटात झालेली विभागणी आणि सत्ता संघर्षामुळे निर्माण झालेल्या जागतिक संघर्षाच्या काळात पंडित जवाहरलाल नेहरूंनी घेतलेली भूमिका महत्वाची ठरली होती. लाल बहादुर शास्त्रींनी 1962–1966 या काळात पंडित जवाहरलाल नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाचे प्रारूप अंमलात आणले होते. श्रीमती इंदिरा गांधी 1966–1984 या काळातील परराष्ट्र धोरणावरही नेहरूंच्या प्रारूपाचा प्रभाव होता. श्रीमती इंदिरा गांधीनी 1971 मध्ये बांगला देशाला स्वातंत्र मिळवून दिले, आणि बंदूकीच्या गोळी ऐवजी मतदानाने परिवर्तन होते हा संदेश दिला.

**भारत चीन संबंध :**
भारताच्या उत्तरेला हिमालयाच्या उत्तुंग पर्वत रांगांच्या पलिकडे विस्तीर्ण पसरलेला चीन हा अशिया खंडातील एक शक्तीशाली व विकसनशील अवस्थेतील देश आहे.

एकोणीसव्या शतकापूर्वी चीन हा एक वैभवशाली सुस्कृती असलेला देश होता. परंतु आठराव्या आणि एकोणीसाव्या ' ातकात पाश्चिमात्य आणि साम्राज्यवादी राष्ट्रांनी त्याचे जे शो षण केले त्यामुळे ते राष्ट्र अविकसित व शोषित राष्ट्र बनवले. चीनसंबंधी नेपोलियनने असे म्हटले होते की, ''चीन हा निद्रिस्त अवस्थेतील राक्षस आहे. त्याला तसेच राहू द्या. तो जर जागा झाला तर संपूर्ण जगाला त्याची दखल घ्यावी लागेल''.

इ.स. 1911 मध्ये चीनने साम्यवादी क्रांती होऊन तेथे गणराज्याची स्थापना झाली. ब्रिटिश कालखंडात तिबेट प्रश्नांवरून भारतातील ब्रिटिश सरकार व चीन यांचा राजकीय संबंध आला. स्वातंत्रोत्तर काळात भारत–चीन संबंधात अनेक चढ–उतार आले, त्याला अनुसरून वर्तमान काळात भारत–चीन संबंधाचा पुढील प्रमाणे विश्लेषण करता येईल.

**1. भारत–चीन सीमा प्रश्न :**

भारत आणि चीनमधील संबंध 1950 मध्ये अतिगुंतागुंतीच्या सीमावादावरुन अतिशय गंभीरपणे ताणले गेले. सीमारेखा ही जमीनीवर स्पष्टपणे आखली गेलेली नसल्याने बऱ्याच ठिकाणी त्यात फरक होता. 1913–14 मध्ये त्यावेळचे चीन, तीबेट आणि ब्रिटन यांच्या प्रतिनिधींनी शिमल्यात बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये झालेल्या बोलणीनुसार त्यावेळच्या ब्रिटीश, भारत आणि तिबेट यांच्यामध्ये 890 किलोमीटरची सीमारेखा आखली गेली. या सीमारेषेला मॅकमोहन रेषा म्हणतात. भारत आणि चीन मध्ये मॅकमोहन रेषा, अॅक्साई चीन आणि सिक्कीम वरुन वाद आहे. चीनने भारताच्या उत्तर आणि उत्तरपूर्व क्षेत्राच्या लडाख, सिक्कीम या बऱ्याच मोठ्या्ा भूभागावर दावा केला. त्याचवेळेस पाकिस्तान आणि चीनमधील काराकोरम विभागातील भुप्रदेश देण्याघेण्यावरुन भारत चिडलेला होता.

**2. अर्थव्यवस्था आणि व्यापार :**

जलद गतीने बदलत्या आंतरराष्ट्रीय वातावरणात जेथे क्षेत्रीय अर्थव्यवस्थेने विचार सरणींना बदलून टाकले आहे. भारत व चीन या दोघांनी त्यांची आर्थिक बंधने दृढ करायचे ठरविले आहे. हे आर्थिक सहकार्य वर्षानुगणिक वाढत आहे. काही अर्थतज्ञ 21 व्या शतकाच्या मध्यापर्यंत चीनडीया (चीन–इंडिया) च्या उदयाचे भाकित करत आहे. व्यापारात सातत्यपूर्ण वाढ होत आहे. 2011 पर्यंत भारत–चीन मधील व्यापाराने 50 अब्ज डॉलरचा पल्ला पार केला आणि त्यांनी 2015 पर्यंत 100 अब्ज डॉलरचे उद्दिष्ट ठेवले होते. जग हे भारत आणि चीनकडे उभरत्या अर्धसत्ता म्हणून बघत आहे.

**3. दहशतवादावर नियंत्रण :**

भारत व चीन हे दोन्ही दहशतवादाच्या हिंसेचे बळी आहे. अर्थात हिंसेची तीव्रता ही दोघांसाठी वेगळी आहे. योगा–योगाने दोन्ही देशातील दहशतवादाचे स्त्रोत हे पाकिस्तान मधून उद्भवले आहे. भारत व चीनमधील दहशतवादाच्या हिंसाचाराच्या मुळाचा भाग पाकिस्तान मधून काढला जाऊ शकतो. पाकिस्तानची जिहादी गटांशी असलेली ऐतिहासिक मिळवणी आणि त्याचे सीमापलिकडच्या दहशतवादाला असलेले प्रोत्साहन व मदत यामुळे या उपखंडातील दहशतवादी हिंसाचारात भर पडलेली आहे. पाकिस्तानसोबत चीनची घनिष्ट मैत्री असून सुद्धा चीन त्याच्या झीनझँग क्षेत्रातील पाकिस्तानच्या भूमिकेला मान्यता देतो.

**4. आण्विक उर्जा :**

आण्विक उर्जा हे असे उभरते क्षेत्र आहे, जेथे हितांच्या अतिक्रमणाच्या संधी अधिक आहे. भारत आणि चीन हे दोघेही उर्जेसाठी भुकेलेले देश आहे. आण्विक उर्जेत त्यांच्या वाढत्या उर्जेची गरज भागवण्याची आणि त्यांचे आखातावरील परावलंबित्व कमी करण्याची क्षमता आहे. चीनला भारताशी आण्विक उर्जाव्यापाराने अधिक लाभ होऊ शकतो. चीन हा आण्विक पुरवठादार गटाचा सदस्य आहे आणि त्याला भारताला आण्विक इंधनाचा पुरवठा करुन खूप लाभ होऊ ' ाकतो.

**5. आर्थिक व लष्करी तफावत :**

भारत व चीन मधील आर्थिक व लष्करी तफावत दिवसेंदिवस वाढत आहे. ज्यामुळे भारताने त्याचे परराष्ट्र आणि सुरक्षाधोरण पर्यायांवर पुर्विचार करणे अत्यावश्यक बनले आहे. चीनची अर्थव्यवस्था ही दरवर्षी 10 ते 12 टक्यांनी वाटत आहे आणि चीनचा दरडोई जीडीपी हा साधारणतः 4000 डॉलर आहे. याउलट भारताचा आर्थिक वृद्धी दर 8 टक्के असून त्यांचे दरडोई जीडीपी फक्त 1000 डॉलर आहे. जर भारत व चीन दोघांनी येत्या दोन दशकात हाच वृद्धीदर जोपासला तर चीनची अर्थव्यवस्था ही भारतरपेक्षा 8 पट जास्त होईल. अर्थतज्ञांच्या मतानुसार 2040 पर्यंत चीनचा जीडीपी हा 123 हजार अब्ज डॉलर पर्यंत वाढेल आणि तो जगाच्या एकूण उत्पन्नच्या 40 टक्के होईल.

**6. राजीव गांधीच्या काळातील संबंध :**

1988 साली तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी 5 दिवसीय चीनचा दौरा केला होता. या दरम्यान दोन्ही देशांत आर्थिक, वैज्ञानिक, तांत्रिक व सांस्कृतीक सहकार्यासाठी एका संयुक्त आयोगाची स्थापना करण्यात आली. यानंतर पुढे डिसेंबर 1991 साली चीनच्या पंतप्रधानांनी 6 दिवसांचा भारत दौरा केला. 31 वर्षानंतर चीनचे पंतप्रधान भारत दौऱ्यावर आले होते. या भेटीदरम्यान पुढील 3 करार झाले होते.

(अ) शांघाय व मुंबई दरम्यान वाणिज्य दुतावास सुरू करणे.

(ब) दोन्ही देशांत सीमा व्यापार सुरू करणे.

(क) दोन्ही देशात अंतराळ संशोधन, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात परस्पर सहयोग करणे.

तसेच दोन्ही देशातील सीमावादाचा तोडगा शीघ्रपणे व परस्पर संमतीने काढला जाईल व अंतिम तोडगा निघेपर्यंत सीमेवर शांतता ठेवली जाईल, असे ठरवण्यात आले.

**7. 1991 नंतरचे भारत चीन संबंध :**

मे 1992 साली भारतरचे राष्ट्रपती श्री. आर. वेंकटरामन चीनच्या रा" ट्रपतींच्या नियंत्रणावरून 6 दिवसांच्या सरकारी दौऱ्यावर चीनला गेले होते. श्री. आर. वेंकटरामन हे चीनला भेट देणारे पहिलेच राष्ट्रपती होते.

या भेटीमुळे भारत–चीन संबंधात धिम्यागतीने सुधारणा झाली. चीनच्या राष्ट्रपतींनीही ही भेट मोठी संधी असल्याचे कौतुक केले. या भेटीत हिंदी–चीनी भाई–भाई चा पुररुच्चार करण्यात आला. सप्टेंबर 1993 साली तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या चीन भेटीनंतर द्विपक्षीय संबंधात रचनात्मक बळ प्राप्त झाले. या दौऱ्याचे सर्वात मोठे यश म्हणजे दोन्ही देशांनी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर शांती व सहकार्य ठेवण्याचे धोरण ठरवले व सीमेवरील परिस्थिती जैसे थे ठेवण्याचे ठरले. यासाठी संयुक्त कार्य गटाची स्थापना करण्यात आली. मे–जून 1994 साली चीनमध्ये भारत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. चीनमध्ये एखाद्या पररा" ट्राचा होणारा पहिलाच मेळावा होता.

**8. चीनच्या राष्ट्राध्यक्षांचा भारत दौरा आणि आर्थिक करार :**

चीनचे पंतप्रधान जिनपींग यांनी दि. 18 ते 22 सप्टेंबर 2014 रोजी भारत दौऱ्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी केलेले आर्थिक करार चीनच्या परराष्ट्र धोरणातील स्थित्यंतर आहे. राष्ट्राध्यक्ष झिनपिंग आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी (अ) चीनची विकास बँक आणि गुजरात सरकारचा औद्योगिक विस्तार ब्युरो यांच्यात इंडस्ट्रियल पार्क उभारणे. (ब) चीनमधील गुआंगझू ' ाहर आणि अहमदाबाद शहर सिस्टर सिटी म्हणून विकसित करणे. (क) गुजरात सरकार आणि चीनमधील गुआंडुंग प्रांत यामधील करार, असे तीन महत्वाचे करार आणि राष्ट्राध्यक्ष झिनपिंग यांनी भारतात मोठ्याा प्रमाणात गुंतवणुक करण्याची इच्छाही व्यक्त केली आहे.

**9. पंतप्रधान नरेंद्र मोदिंची भारत चीन परराष्ट्र धोरणातील चाणक्य निती :**

पंतप्रधान नरेंद्र मोदीनी सत्ताग्रहण केल्यानंतर म्हणजे ऑगस्ट 2014 पासुन परराष्ट्र संबंधावर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. शेजारच्या देशांना भेटी देवून परराष्ट्रसंबंध अधिक दृढ करीत आहेत. चीनशी एका बाजूला मैत्री करीत आहेत. आणि जपान दौऱ्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चीनवर अप्रत्यक्षपणे केलेली टिका बरेच काही सांगून जाते. जपान दौऱ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी असे म्हणाले की, आता अठराव्या शतकाचे दिवस गेलेले आहेत, त्याकाळी आक्रमक राष्ट्र आपले साम्राज्य वाढविण्यासाठी दुसऱ्यांवर आक्रमणे करायची ही आक्रमणे जमिनी आणि सागरी मार्गाने होत असत. आता अशा प्रकारच्या गोष्टी होऊ नयेत. यावरून असे स्पष्ट होते की, लडाख आणि अरूणाचल प्रदेशमधील चीनची घुसखोरी, दक्षिणपूर्व आशियातील देशांच्या बेटावर आणि जपानी बेटावरील हल्ले या अनुशंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदींनी चीनला इशारा दिला आहे. याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

**10. चीनसंबंधी जनसंघाची बदलती भूमिका :**

1962 च्या चीन युद्धावेळी जनसंघाने सरकारवर मोठा दबाव आणून चीन विरोधी पावले उलण्याची मागणी केली होते. चीनने तिबेटमध्ये हस्तक्षेप केल्यानंतर जनसंघाने पंचशील तत्वांची खिल्ली उडविली होती आणि चीनी दुतावासापुढे निदर्शनेही केली होती. परंतु जागतिकीकरणानंतर जनसंघाच्या विचारातही स्थित्यंतरे घडतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**समारोप :**

भारत आणि चीन यांच्यातील परस्पर संबंधाचा विचार केला तर असे दिसुन येते की, जे काही परिवर्तण दोन देशांदरम्यन झाले आहे ते तडकाफडकीने झालेले नाही. गेल्या अनेक दशकांापासून बदलत जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा तो परिपाक आहे. चीनने काश्मीर प्रश्नाबाबत आपल्या पूर्वीच्या भूमिकेतही परिवर्तन घडवून आणले आहे. भारत आणि चीन या दोन्ही राष्ट्रांना दहशतवादाच्या समस्येचा सामना करावा लागत आहे. या दहशतवादाचे केंद्र पाकिस्तानमध्ये आहे, याचीही जाणीव त्यांना आहे. या समस्येचा सामना करण्यासाठी सामूहिक प्रयत्न दोघांसाठी फायद्याचे ठरणार आहे.

**संदर्भ :**


1. *दीक्षित जे. एन., भारतीय विदेशनिती, प्रभात एग्जाम, नई दिल्ली, 2021.*
2. *भारताचे परराष्ट्र धोरण, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 2018.*
3. *तोडकर बी. डी., आंतरराष्ट्रीय संबंध, भारताचे परराष्ट्रीय धोरण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2017.*
4. *पाटील वा. भा., आंतरराष्ट्रीय संबंध, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2011.*
5. *कुमार पवन, भारत की विदेश नीती, ओमेगा पब्लीकेशन्स, नई दिल्ली, 2006.*
6. *देवळाणकर शैलेंद्र, आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, 2004.*
7. *लोटे रा. ज., भारतरची विदेशनीती, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, नागपूर.*